दिनांक 04/11/2017

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि 03/11/2017 रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या (28) वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन 9200/– रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री करणाऱ्याविरूध्द जिल्हयातील पोलीस स्टेशन अंतर्गत विशेष मोहिम राबविली जात असुन, या मोहिमे अंतर्गत दिनांक 03/11/2017 रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत पो.स्टे सेनगाव, कुरूंदा, नर्सी, हिंगोली शहर, हिंगोली ग्रामीण, कळमनुरी, बासंबा, औंढा, वसमत ग्रामीण, वसमत शहर, हटटा, बाळापुर, हदीत (21) ठिकाणी छापे टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून देशी व विदेशी दारूचे असा एकूण किंमती 29030/– रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन, आरोपी विरूध्द दारूबंदी कायदया अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहेत.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळवणाऱ्याविरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत विशेष मोहिम राबविली जात असुन या मोहिमे अंतर्गत दिनांक 03/11/2017 रोजी जुगार कायदया अंतर्गत पो.स्टे. कळमनुरी, सेनगाव हददीत (02) ठिकाणी छापा मारून आरोपी यांच्या विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडून जुगाराचे साहीत्य नगदी 960 रु. मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन, आरोपीतां विरूध्द जुगार कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहेत.

**अपघात :–**

दिनांक 03/11/2017 रोजी फिर्यादी दिपक उत्तमराव जावळेकर रा. वसमत जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत शहर येथे कलम 279,337,338 भादवी प्रमाणे वसमत ते परभणी जाणाऱ्या रोडवर मॅक्स जिप क्र एम.एच 22 डि 2061 च्या चालकाने हयगय व निष्काळजीपणाने भरधाववेगात येवुन फिर्यादीचे मो.सा.क्र एम.एच 26 एस 403 ला धडक देवून फिर्यादी व साक्षीदार जखमी करून इतर ठिकाणी मुक्कामार लागण्यास कारणीभुत ठरला असून या संदर्भात वसमत शहर पोलीस तपास करीत आहेत.

दिनांक 03/11/2017 रोजी फिर्यादी सुरेश नारायण आमले रा.भिंगी ता.जि. हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली ग्रामीण येथे कलम 304 अ, 279, 337, 427 भादवी प्रमाणे हिंगोली ते वाशिम जाणाऱ्या रोडवर दत्त मंदीर जवळ बळसोंड शिवारात आरोपीच्या ताब्यातील बोलेरो जिप क्र एम.एच 38 7189 डी जिप चालकाने हयगय व निष्काळजीपणाने भरधाववेगात चालवुन टाटा मॅजीक ॲटो क्र 48 ए 0175 यास समोरून जोराची धडक देवून चालक यास जखमी करून फिर्यादीचा भाऊ गजानन नारायण आमले यास गंभीर जखमी करून तयाचे मरणास कारणीभुत झाला असून या संदर्भात हिंगोली ग्रामीण पोलीस तपास करीत आहेत.

पोलीस अधिक्षक हिंगोली